भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur

An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२५-२६: साप्ताहिक अट्ठाविसावा पीकसल्ला

## ८ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२५

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस (मिमी) | | | | | | पडणाऱ्या पावसाचा अंदाज (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डिसेंबर | | | | | | डिसेंबर | | | | |
| | | 02 | 03 | 04 | 05 | 06 | 07 | 08 | 09 | 10 | 11 | 12 |
|  | धुळे | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक स्थिती:**

अकोला येथे पेरणीच्या तारखेनुसार पिक सध्या बोंड फुटण्याच्या आणि वेचणीच्या अवस्थेत आहे. कापूस वेचणी सुरू आहे. कीडनाशकांची फवारणी करण्यात आली आहे. नॉन-बीटी आणि बीटी हायब्रिड्सवर गुलाबी बोंडअळीत (Pink Bollworm) प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त म्हणजेच सुमारे २०–२५% पर्यंत आढळून आला आहे. काही शेतांमध्ये पानांवरील डाग (Leaf spots) दिसून आले.

नांदेड येथे पेरलेला कापूस सध्या कापणीच्या अवस्थेत आहे. वेचणी सुरू आहे. पीक संरक्षणाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शेतात तणांचा प्रादुर्भाव झाला आहे. पांढरी माशी, मावा आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळला. बोंड कुज (Boll rot) हे देखील नोंदवण्यात आले.

राहुरी येथे कापसाचे पीक कापणीच्या अवस्थेत आहे. बहुतेक शेतकऱ्यांची कापूस वेचणी पूर्ण झाली आहे. उशिरा पेरलेल्या जाती बोंड फुटण्याच्या अवस्थेत आहेत. तुडतुडे आणि फुलकिडे यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा खाली होता, तर मावा आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा पेक्षा जास्त नोंदवण्यात आला. झाडाच्या खालच्या पानांवर टीएसव्ही (४५–५०%) आणि बोंड कुज आढळून आले.

**पीक सल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी स्वच्छ कापूस वेचणीला प्राधान्य द्यावे. वेचलेला कापूस जातीप्रमाणे वेगळा ठेवावा. पुढील हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत कापसाची वेचणी पूर्ण करावी. लवकर येणाऱ्या बीटी कापूस जातींची कापणी झाल्यानंतर सिंचनाची सोय असल्यास अधिक आर्थिक फायद्यासाठी हरभरा किंवा गहू यापैकी कोणतेही रब्बी पीक घ्यावे. गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसान पातळी (५-८ पतंग प्रति सापळा प्रति रात्र सलग ३ दिवस किंवा १०% हिरव्या बोंडांवरील प्रादुर्भाव) ओलांडल्यावर, आणि प्रत्येक झाडावर किमान ८-१० हिरवी बोंडे असताना, प्रति एकर फेनव्हॅलेरेट २०% ईसी @ २०० मिलि किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ २०० मिलि किंवा सायपरमेथ्रिन १०% ईसी @ २५० मिलि किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ १०० मिलि किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ २०० मिलि किंवा अल्फासायपरमेथ्रिन १०% ईसी @ १२० मिलि किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी @३०० मिलि यापैकी कोणत्याही औषधाची फवारणी करावी. बुरशीजन्य पानांवरील डाग आणि बोंड कुज नियंत्रणासाठी प्रति लिटर पाण्यात (अझोक्सीस्ट्रोबिन १८.२% डब्लू/ डब्लू + डाईफेनोकोनाझोल ११.४% डब्ल्यू/डब्ल्यू एससी) @ १ मिली किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी @ १मिलि किंवा थिओफेनेट मिथाइल ७० डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ०.४ ग्रॅम किंवा (कार्बेन्डाझिम १२% +मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी) @ २.५ ग्रॅम किंवा प्रोपिनेब ७०% डब्ल्यूपी @२.५- ३ ग्रॅम किंवा (मेटिराम ५५ % पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी) @ २ ग्रॅम + (फ्लक्सापायरोक्सॅड १६७ ग्रॅम/एल पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/एल एससी) @ ०.६ मि.ली. किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३% एससी @ १ मिलि यापैकी कोणतीही शिफारस केलेली फवारणी करावी.

नांदेड येथे शेतकऱ्यांनी वेचणीप्रमाणे कापूस वेगळा साठवावा. साठवणुकीपूर्वी कापसाला सावलीत चांगले वाळवावे. स्वच्छ आणि सुरक्षित वेचणीसाठी कापूस वेचणीचा ऍप्रन वापरावा. गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसान पातळी (५-८ पतंग प्रति सापळा प्रति रात्र सलग ३ दिवस किंवा १०% हिरव्या बोंडांवरील प्रादुर्भाव) ओलांडल्यावर, आणि प्रत्येक

झाडावर किमान ८-१० हिरवी बोंडे असताना, प्रति एकर फेनव्हॅलेरेट २०% ईसी @ २०० मिलि किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ २०० मिलि किंवा सायपरमेथ्रिन १०% ईसी @ २५० मिलि किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ १०० मिलि किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ २०० मिलि किंवा अल्फासायपरमेथ्रिन १०% ईसी @ १२० मिलि किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी @३०० मिलि यापैकी कोणत्याही औषधाची फवारणी करावी. तसेच बुरशीजन्य पानांवरील डाग आणि बोंड कुज नियंत्रणासाठी प्रति लिटर पाण्यात (अझोक्सीस्ट्रोबिन १८.२% डब्लू/ डब्लू + डाईफेनोकोनाझोल ११.४% डब्ल्यू/डब्ल्यू एससी) @ १ मिली, प्रोपिकोनाझोल २५ ईसी @ १मिलि, थिओफेनेट मिथाइल ७० डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम, कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ०.४ ग्रॅम, (कार्बेन्डाझिम १२% +मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी) @ २.५ ग्रॅम, प्रोपिनेब ७०% डब्ल्यूपी @२.५ ग्रॅम, (मेटिराम ५५ % पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी) @ २ ग्रॅम + (फ्लक्सापायरोक्सॅड १६७ ग्रॅम/एल पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/एल एससी) @ ०.६ मि.ली., क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३% एससी @ १ मिलि यापैकी कोणतीही शिफारस केलेली फवारणी करावी.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी चांगले उघडलेले बोंड आणि खराब/दुषित बोंड वेगवेगळे वेचून त्यांना स्वतंत्रपणे कोरड्या ठिकाणी साठवण्याचा सल्ला देण्यात येत आहे. रब्बी हंगामासाठी पिकाची कापणी झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर पिकाची समाप्ती करावी. शेवटच्या वेचणीनंतर गुलाबी बोंडअळीचा पुढील हंगामातील प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेतात मेंढ्या-शेळ्या चारण्यास सोडाव्यात. शक्य असल्यास कापसाच्या खोडांची श्रेडरने बारीक करून जमीनित मिसळणी करावी. गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसान पातळी (५-८ पतंग प्रति सापळा प्रति रात्र सलग ३ दिवस किंवा १०% हिरव्या बोंडांवरील प्रादुर्भाव) ओलांडल्यावर, आणि प्रत्येक झाडावर किमान ८-१० हिरवी बोंडे असताना, प्रति एकर फेनव्हॅलेरेट २०% ईसी @ २०० मिलि किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ २०० मिलि किंवा सायपरमेथ्रिन १०% ईसी @ २५० मिलि किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ १०० मिलि किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ २०० मिलि किंवा अल्फासायपरमेथ्रिन १०% ईसी @ १२० मिलि किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी @३०० मिलि यापैकी कोणत्याही औषधाची फवारणी करावी. तसेच बुरशीजन्य पानांवरील डाग आणि बोंड कुज नियंत्रणासाठी प्रति लिटर पाण्यात (अझोक्सीस्ट्रोबिन १८.२% डब्लू/ डब्लू + डाईफेनोकोनाझोल ११.४% डब्ल्यू/डब्ल्यू एससी) @ १ मिली, प्रोपिकोनाझोल २५ ईसी @ १मिलि, थिओफेनेट मिथाइल ७० डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम, कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ०.४ ग्रॅम, (कार्बेन्डाझिम १२% +मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी) @ २.५ ग्रॅम, प्रोपिनेब ७०% डब्ल्यूपी @२.५ ग्रॅम, (मेटिराम ५५ % पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी) @ २ ग्रॅम + (फ्लक्सापायरोक्सॅड १६७ ग्रॅम/एल पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/एल एससी) @ ०.६ मि.ली., क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३% एससी @ १ मिलि यापैकी कोणतीही शिफारस केलेली फवारणी करावी.